# महाराष्ट्र शासन
# पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग


उपसंचालक यांचे कार्यालय
भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा
4 था मजला, विकास भवन, अदालत रोड
औरंगाबाद विभाग, औरंगाबाद ४३१००१

दूरध्वनी ०२४०-२३३४०६६/२३३१६०७
फॅक्स- ०२४०-२३३१५९६
ईमेल ddau_gsda@rediffmail.com


---

जाक्र.उपस/औ/आस्था-१/भरती/ /२०१३ दिनांक :-

## जाहिरात क्रमांक ०१/२०१३

उपसंचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांच्या अंतर्गत विविध कार्यालयातील खालील तपशिलाप्रमाणे रिक्त पदे भरण्यासाठी पात्र उमेदवाराकडून खालील अटीच्या अधिनराहून विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | पदाचे नाव व वेतनश्रेणी (६ व्या वेतन आयोगानुसार) | एकूण पद संख्या | आरक्षित पद | पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हता व अनुभव |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| ०१ | सर्वेक्षक<br>वेतन बँड पीबी-३<br>रू. ५२००-२०२००<br>ग्रेड वेतन रू. २४०० | ०८ | **इमाव-०२**<br>(माजी सैनिक-०१, महिला-०१)<br>**खुला-०६**<br>(माजी सैनिक-०१, महिला-०२, खेळाडू-०१, प्रकल्पग्रस्त-०१, अंशकालीन-०१) | माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (एसएससी) अथवा शासन मान्य समकक्ष परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाची (एमएससीआयटी) संगणक परिक्षा उत्तीर्ण अथवा शासनाने मान्य केलेली संगणक हाताळणी बाबतची समकक्ष अर्हता धारण केलेली असावी. तसेच स्थापत्य अभियांत्रिकी मधील पदविका किंवा शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधून सर्वेक्षक कोर्स उत्तीर्ण असावा. प्लेन टेबल, शंकूसाखळी, थिओडोलाईट द्वारे सर्वेक्षण कामाचा तसेच नकाशे प्लॉटींग तयार करणे, लेव्हलिंग आणि प्लॉटींग कंटूर्स व ट्रॅव्हर्सिंग या कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य. |
| २ | भौगोलिक माहिती प्रणाली वरिष्ठ सहाय्यक (आरेखक)<br>वेतन बँड पीबी-३<br>रू. ५२००-२०२००<br>ग्रेड वेतन रू. २८०० | ०१ | **खुला-०१** | मान्यता प्राप्त विद्यापीठाची स्थापत्य/यांत्रिकी/विद्युत अभियांत्रिकी मधिल पदवी किंवा शासन मान्यता प्राप्त संस्थेमधन स्थापत्य/ यांत्रिकी/ विद्युत अभियांत्रिकी मधिल पदविका उत्तीर्ण असावा. तसेच महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाची (एमएससीआयटी) संगणक परिक्षा उत्तीर्ण अथवा शासनाने मान्य केलेली सगणक हाताळणी बाबतची समकक्ष अर्हता धारण केलेली असावी. |

| अ. क्र. | पदाचे नाव व वेतनश्रेणी (६ व्या वेतन आयोगानुसार) | एकूण पद संख्या | आरक्षित पद | पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हता व अनुभव |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| ३ | भौगोलिक माहिती प्रणाली सहाय्यक वेतन बँड पीबी-३ रू. ५२००-२०२०० ग्रेड वेतन रू. २००० | ०५ | **इमाव-०१** (महिला) **अज-०१** (माजी सैनिक) **खुला-०३** (माजी सैनिक-०१ खेळाडू-०१ अंशकालीन-०१) | माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा उत्तीर्ण आवश्यक आहे आणि महाराष्ट्र शासनाची ड्राईंगमधील इंटरमिडीएट ग्रेड परिक्षा उत्तीर्ण अथवा शासन मान्य आद्योगिक प्रशिक्षण संस्थेतून अनुरेखक कोर्स उत्तीर्ण असावा. तसेच महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाची (एमएससीआयटी) संगणक परिक्षा उत्तीर्ण अथवा शासनाने मान्य केलेली संगणक हाताळणी बाबतची समकक्ष अर्हता धारण केलेली असावी. |

१) दिनांक ०१/१२/२०१३ रोजी उमेदवारांचे वय किमान १८ वर्षे व कमाल ३३ वर्षे असावे.
२) मागासवर्गीय उमेदवारांसाठी कमाल वय ३८ वर्ष असे राहिल.
३) माजी सैनिक उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्षापर्यंत शिथिलक्षम राहिल.
४) शासन सेवेत कार्यरत कर्मचाऱ्यांसाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे राहिल.
५) अर्ज स्विकारण्याची शेवटची तारीख २३/०१/२०१४ सायंकाळी ०५.४५ वाजेपर्यंत राहील.
६) पद भरती संदर्भात वेळोवेळी बदल झाल्यास त्या बाबतची माहिती कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रसिध्द् करण्यात येईल.
७) पदासाठी महत्वाच्या सूचना तसेच अटी व शर्ती, अर्जाचा नमुना खालीलप्रमाणे आहे.
८) शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही/१०९७/प्र.क्र.३१/९८/१६-अ दिनांक १६/३/१९९९ अन्वये शासन सेवेत सरळ सेवा भरतीसाठी समांतर आरक्षण लागू राहिल. समांतर आरक्षणातील पद उपलब्ध न झाल्यास सदर पद हे संबंधीत सामाजिक आरक्षणातून गुणवत्तेनुसार भरण्यात येईल.

उपसंचालक
भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा
औरंगाबाद

**<u>महत्वाच्या सूचना</u> :-**

१) उमेदवार भारतीय नागरिक असावा.

२) प्रत्येक पदासाठी स्वतंत्रपणे अर्ज करणे आवश्यक आहे.

३) सर्व पदांसाठी मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक आहे.

४) बडतर्फीने, गैरवर्तणूक किंवा अकार्यक्षमता या कारणांसाठी अथवा सैनिकी सेवेसाठी शारिरीक क्षमता नसल्याने किंवा आजारपणामुळे सेवा संपुष्टात आलेले माजी सैनिक सवलतीसाठी पात्र ठरणार नाहीत.

५) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक आरटीए-१०९०/२२/प्र.क्रं.६/९३/१२, दिनांक ८ जून १९९३ नुसार राज्य शासनाच्या सेवेमध्ये गट क व ड मध्ये माजी सैनिकाची एकदा नियुक्ती झाल्यानंतर गट क गट ड मध्ये तो धारण करीत असलेल्या पदापेक्षा उच्च श्रेणी व अन्य संवर्ग यातील नियुक्तीसाठी माजी सैनिक म्हणून अनुज्ञेय ठरविण्यात आलेल्या वयोमर्यादेची सुट सदर नवीन नियुक्तीसाठी देखील अनुज्ञेय राहील. मात्र त्यांना माजी सैनिक म्हणून माजी सैनिकांसाठी राज्य शासनाच्या सेवेत असलेल्या आरक्षणाचा फायदा मिळणार नाही.

६) महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूचित जाती, अनु.जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग, इतर मागास वर्ग, यांच्यासाठी आरक्षण अधिनियम २००१ ( सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ८) हा अधिनियम महाराष्ट्र शासनाने दि. २९ जानेवारी, २००४ पासून अंमलात आणला आहे. त्यानुसार उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमिलेअर तत्व) वि.जा. (अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड) विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्ग यांना लागू आहे. या प्रवर्गातील उमेदवारांनी जात उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

७) महिला आरक्षण हे शासन निर्णय महिला व बाल विकास विभाग क्रमांक ८२/२००१/मसेआ २०००/प्र.क्र. ४१५/का-२, दि. २५ मे, २००१ मधील तरतूदीनुसार राहील. खुल्या प्रवर्गातील महिलांना उन्नत आणि प्रगत व्यक्ती व गट (क्रिमीलेअर) यामध्ये मोडत नसल्याबाबतचे सक्षम अधिकारी यांचे (नॉन क्रिमिलेअर) प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

८) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक प्रशिक्षण २०००/प्र.क्रं.६१/२००१/३९ दिनांक १९/३/२००३ अन्वये संबधित पदाकरिता संगणक हाताळणी / वापराबाबतचे खालील परीक्षा प्रमाणपत्र उमेदवारांनी नियुक्तिपासून दोन वर्षाचे आंत प्राप्त करावे लागेल अन्यथा सेवा समाप्त होईल.

अ) D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत C.C.C. किंवा O स्तर किंवा A स्तर किंवा B स्तर किंवा C स्तर पैकी कोणतीही एक परीक्षा उत्त्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा

ब) महाराष्ट्र राज्य, उच्च तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांच्याकडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.

९) शासन अधिसुचना, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही-२०००/प्र.क्रं.(१७/२०००)/१२ दिनांक २८ मार्च २००५ नुसार शासन सेवेतील गट अ ते गट ड मधिल सर्व पदांवर सरळ सेवेने करावयाच्या नियुक्तीसाठी विहीत केलेली लहान कुटूंबाची अतिरिक्त अट लागू केलेली आहे. या नियमातील तरतुदीनुसार शासकीय सेवेतील पदासाठी अर्ज करताना अर्जा सोबत उमेदवाराने विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे.

१०) उमेदवाराने सोबत जोडलेल्या विहित नमुन्यात ३० से.मि. x २० से.मी. आकाराच्या पांढऱ्या जाड कागदावर एकाच बाजूला टंकलिखित करुन अर्ज करावा.

११) लिफाफ्यावर **ज्या पदासाठी अर्ज केला आहे त्या पदाचा** उल्लेख करावा.

१२) उमेदवाराने अर्जाच्या विहित नमुन्यात दर्शविलेल्या स्थानी स्वत: सांक्षाकित केलेला पासपोर्ट आकाराचा फोटे चिकटावा.

१३) उमेदवारांनी अर्जासोबत खालील नमूद केलेल्या कागदपत्रांच्या साक्षांकित छायाकिंत प्रती जोडणे आवश्यक आहे. (मुळ प्रमाणपत्रे पाठवू नयेत)

(१) जन्मतारखेची नोंद असलेले एस.एस.सी. प्रमाणपत्र./शाळा सोडल्याचा दाखला

(२) शैक्षणिक पात्रता पदविका/पदवी/पदव्युत्तर पदवी प्रमाणपत्र व गुणपत्रक.

(३) राखीव उमेदवारांसाठी-जातीचे प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र.

(४) अनुभव असल्यास अनुभवाचे प्रमाणपत्र.

(५) सक्षम वैद्यकीय प्राधिकाऱ्याचे ४० टक्के अथवा त्याहून अधिक अपंगत्वाचे प्रमाणपत्र.

(६) लहान कुटूंबाचे प्रमाणपत्र

(७) नॉनक्रिमिलेयर प्रमाणपत्र

(८) महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असल्याचे प्रमाणपत्र.

(९) माजी सैनिकांच्या बाबतीत ते माज सैनिक असल्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्यांनी दिलेले प्रमाणपत्र. वरील कागदपत्रांच्या साक्षांकित छायाप्रती नसल्यास संबंधीत पदासाठी केलेला अर्ज अपुर्ण समजून नाकारण्यात येईल.

१४) उमेदवारांनी अर्जासोबत खुल्या प्रवर्गासाठी रु. २००/- व मागास प्रवर्गासाठी रु. १००/- चे परीक्षा शुल्क महाराष्ट्र राज्याचे न्यायालयीन फी मुद्रांकाच्या स्वरुपात (कोर्ट फी स्टॅम्प ) अर्जाला जोडावे. अर्जदाराला कोर्ट फी स्टॅम्प मिळविणे शक्य नसेल तर त्यांनी रेखांकित भारतीय पोस्टल ऑर्डरद्वारे आवेदन शुल्क भरणे आवश्यक आहे. तसेच अर्जासोबत स्टँपपेपर जोडू नयेत. अर्जासोबत २३ X १३ से.मी. आकाराच्या स्वत:चे नाव व पत्ता असलेला रु. १०/- चे तिकीट लावलेला एक लिफाफा पाठवावा. शासकीय / निमशासकीय सेवेत असलेल्या उमेदवारांनी त्यांचे अर्ज त्यांचे कार्यालय प्रमुखामार्फत कार्यालयाचे नाहरकत प्रमाणपत्र घेऊन सादर करावे. माजी सैनिकांना अर्जासोबत आवेदन शुल्क भरण्याची अट लागू नाही.

१५) उमेदवारांनी विहित नमुन्यातील अर्ज भरुन उपसंचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, ४ था माळा, विकास भवन, अदालत रोड, औरंगाबाद ४३१ ००१ या पत्यावर दिनांक २३/०१/२०१४ रोजी सायंकाळी ०५.४५ पर्यंत किंवा तत्पूर्वी पोहोचतील अशा बेताने पाठवावेत. तसेच कार्यालयीन वेळेमध्ये (शासकीय सुट्टीचे दिवस वगळून) प्रत्यक्षणपे अर्ज स्वीकारले जातील. ईमेल, फॅक्सद्वारे प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. विहीत केलेल्या दिनांकानंतर मिळालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. पोष्टामार्फत विलंब झाल्यास तो अर्ज कोणत्याही परिस्थितीत विचारात घेतला जाणार नाही. उमेदवाराच्या अर्जावरील दिनांक अथवा पोष्टाच्या शिक्यावरील दिनांक याचा विचार न करता अर्ज या कार्यालयास प्राप्त झाल्याचा दिनांक ध्यानात घेऊनच अर्ज विहित मुदतीत प्राप्त झाला किंवा नाही यावर निर्णय घेण्यात येईल. या सर्व बाबींचा विचार करुन उमेदवारांनी आपले अर्ज पाठविण्याची काळजी घ्यावी. कुरिअर मार्फत अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

१६) उमेदवाराच्या अर्जावरील दिनांक अथवा पोष्टाच्या शिक्यावरील दिनांक अथवा इतर कोणत्याही प्रकारचा विलंब याचा विचार करण्यात येणार नाही.

१७) अर्जाची छाननी करुन पात्र उमेदवारांना लेखी परीक्षेस बोलाविण्यात येईल. जे उमेदवार लेखी परीक्षेत पात्र ठरतील अशा उमेदवारांना मुलाखत व व्यक्तीमत्व चाचणीसाठी बोलाविण्यात येईल. उमेदवारांना त्यासाठी स्वखर्चाने हजर रहावे लागेल. (लेखी परिक्षा/मुलाखतीचा कार्यक्रम स्वतंत्रपणे कळविण्यात येईल)

१८)	विहित पात्रता धारन न करणाऱ्या उमेदवारांचे अर्ज, अपूर्ण व चुकीचे भरलेले अर्ज, वय, शैक्षणिक अर्हता, जातीचा दाखला इ. संदर्भातील आवश्यक त्या प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती नसलेले अर्ज, कोर्ट फी स्टँप अथवा इंडीयन पोस्टल ऑर्डर न जोडलेले अर्ज, विहित मुदतीनंतर प्राप्त झालेले अर्ज, अन्य मार्गाने शुल्क भरलेले अर्ज व कुठल्याही प्रकारचा दबावतंत्र वापरण्याचा प्रयत्न करणा-याचे अर्ज अपात्र समजण्यात येतील. अशा अपात्र ठरविलेल्या अर्जाच्या बाबतीत त्या उमेदवारांना स्वतंत्रपणे कळविण्यात येणार नाही.

१९)	शासन निर्णय क्र.अनियो-१००५/१२६/सेवा ४, दि. ३१ ऑक्टोबर, २००५ नुसार नव्याने नियुक्त होणा-या कर्मचा-यांसाठी नवीन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू राहील. त्याच प्रमाणे महाराष्ट्र शासनाने भरतीकिरता वेळोवेळी जाहिर केलेले सर्व शासन निर्णय बंधनकारक राहतील.

२०)	लेखी परीक्षा / मुलाखत याबाबतचे वेळापत्रक नंतर प्रसिध्द् करण्यात येईल.

२१)	न्यायालयीन स्थगिती / निवाडा किंवा शासन निर्णयामुळे निवड प्रक्रीया कुठल्याही स्तरावर स्थगित / रद्द करण्याचे अधिकार निवड समितीला राहतील.

२२)	पद भरती संबंधित कुठलाही वाद निर्माण झाल्यास औरंगाबाद न्यायालयीन कक्षेच्या अंमलाखाली राहील.

२३)	वरील पदावर शासन सेवेत नियुक्त होणाऱ्या उमेदवारास औरंगाबाद विभागातील कोणत्याही जिल्हा कार्यालयामध्ये / विभागीय कार्यालयामध्ये काम करावे लागेल.

२४)	अंतीम निवड झालेल्या उमेदवारांना रुजू झाल्यानंतर विहित केलेली खातेनिहाय परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

२५)	अर्जदाराने कार्यालयाशी प्रत्यक्ष / अप्रत्यक्ष संपर्क साधणे अपात्र समजले जाईल.

२६)	पदाच्या संख्येत वाढ किंवा घट झाल्यास, रिक्त पदाच्या संख्येत बदल करण्या बाबत, जाहिरातीत बदल किंवा दुरुस्ती करण्या बाबत, तसेच संपुर्ण जाहिरात रद्द करण्या बाबतचे अधिकार उपसंचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, औरंगाबाद यांना राहतील.

२७)	अनुसुचित जाती व जमाती व्यतीरिक्त विजा(अ), भज (ब) भज(क) भज(ड) इतर मागासवर्ग आणि विशेष मागासवर्ग यांना उन्नत व प्रगत गटाचे तत्त्व लागू आहे. अशा संबधित उमेदवारांने शासन परिपत्रक सामाजीक न्याय, सांस्कृतिक कार्य विशेष सहाय्य विभाग, क्रमांक सीबीसी-१०/२००६/प्र.क्रं.१५/मावक-५ दिनांक ५ जून २००६ नुसार त्या बाबतचे अप्रगत गट प्रमाणपत्राची (नॉनक्रिमिलेयर प्रमाणपत्र) मुळ प्रत मुलाखतीच्या वेळेस सादर करणे आवश्यक राहिल.

२८)	शासन परिपत्रक, आदिवासी विभाग क्रमांक १४/२०००/प्र.कं.४३/व-१० दिनांक २४/५/२००१ नुसार निवड झालेल्या अनुसुचित जमाती प्रवर्गातील उमेदवारांला जातीचे वैधता प्रमाणपत्र सादर केल्या नंतरच नेमणूकीचे आदेश देण्यात येईल.

२९)	शासन अधिसुचना, सामाजीक न्याय, सांस्कृतीक कार्य विशेष सहाय्य विभाग क्रमांक सीबीसी-१०/२००४/प्र.क्रं.५०० मावक-५ दिनांक ५ मार्च २००५ नुसार निवड झालेल्या मागासवर्गीय उमेदवारांना (अनुसुचित जमाती वगळून) ६ महिन्याच्या कालावधीत तत्सम प्राधिकारणाकडून जातीचे वैधता प्रमाणपत्र प्राप्त करुन सादर करावे लागेल.

उपसंचालक
भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा
औरंगाबाद

| |
|---|
| **कोर्ट फी स्टँप** |

## अर्जाचा नमुना

**टिप -** अर्जदाराने अर्जातील सर्व माहिती भरणे आवश्यक आहे. या जाहिरातीतील विहित नमुन्यात नसलेले अर्ज, टंकलिखित नसलेले अर्ज, अपूर्ण माहिती भरलेले अर्ज, विहित रकमेची इंडियन पोस्टल ऑर्डर / कोर्ट फी स्टँप न जोडलेले अर्ज, अव्यवस्थित असलेले अर्ज व विलंबाने प्राप्त झालेले अर्ज अपात्र ठरविण्यात येतील.

| **फक्त कार्यालयीन उपयोगाकरिता** | |
|---|---|
| अर्जाचा कार्यालयीन नोंदणी क्रमांक | |
| जातीचा प्रवर्ग | |
| | |

| |
|---|
| उमेदवाराचा अलीकडे काढलेला पासपोर्ट स्वस्वाक्षरीत फोटो. |

---

१. पदाचे नांव :-

२. लिंग (पुरुष/स्त्री) :-

३. उमेदवाराचे संपूर्ण नांव (आडनांव प्रथम) :-

४. जन्मतारीख :-
( दि. ०१/१२/२०१३ रोजी) वय वर्ष महिने

५. संपूर्ण पत्ता :- ------------------------------------------
------------------------------------------
------------------------------------------

संपर्कासाठी दूरध्वनी क्रमांक :- ------------------------------------------
(STD कोडसहीत)
अथवा भ्रमणदूरध्वनी क्रमांक :- ------------------------------------------
असल्यास ईमेल आयडी ------------------------------------------

६. अ) (अ) जात --------------- जातीचा प्रवर्ग ---------------------
(ब) जातीचा प्रवर्ग (योग्य तेथे √ अशी खूण करावी.)

| अनु.जाती | अनु.जमाती | वि.जा.(अ) | भ.ज.(ब) | भ.ज.(क) | भ.ज.(ड) | वि.मा.प्र. | इ.मा.व. | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |

७. अर्ज कोणत्या जातीच्या प्रवर्गासाठी केला आहे ------------------
(प्रवर्ग स्पष्ट अक्षरात नमूद करावा)
उन्नत व प्रगत (क्रिमिलेअर) गटात समाविष्ट असणा-या भ.ज.(क), भ.ज.(ड), वि.मा.प्र. व इतर मागास प्रवर्गातील उमेदवारांनी खुला प्रवर्ग नमूद करावा.

८. अर्जदार विवाहित / अविवाहित √ अशी खूण करावी.

| विवाहित | अविवाहित |
|---|---|
| | |

९. अ) अर्जदार माजी सैनिक आहे काय ? ( होय / नाही )
ब) अर्जदार प्रकल्पग्रस्त / भूकंपग्रस्त आहे काय ? ( होय / नाही )
क) अर्जदार अपंग आहे काय ? ( होय / नाही )

१०. शैक्षणिक / तांत्रिक पात्रता

| परीक्षेचे नांव | मंडळ / विद्यापिठ | उत्तीर्ण वर्ष | विषय | गुणांची टक्केवारी | अर्जासोबत साक्षांकीत सत्यप्रत जोडली असल्यास √ अशी खूण करावी. |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

११. अनुभव

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव व संपूर्ण पत्ता | कामाचा कालावधी | | पदाचे नांव व वेतनश्रेणी | कामाचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|
| | | पासून | पर्यन्त | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

१२. नोकरीसाठी शासनाचे अधिकृत कार्यालयाकडे नोंदणी क्रमांक ------------------------------

१३. इतर तपशील :-----------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------

**उमेदवाराचे संपूर्ण नाव व स्वाक्षरी**

## -:: प्रतिज्ञापन ::-

मी असे प्रमाणित करतो / करते की प्रस्तुत पदाची जाहिरात / अधिसूचना वाचली असून त्यातील पदविषयक माहिती मी काळजीपूर्वक वाचली आहे, व मला ती मान्य आहे. सदर परीक्षेस प्रवेश मिळण्यासाठी अधिसूचनेत नमूद केलेल्या सर्व अटी व शर्तींची मी पूर्तता करतो / करते याची मी खात्री केली आहे. या अर्जात दिलेली माहिती, माझ्या माहिती प्रमाणे बरोबर व खरी आहे. तसेच अर्जात दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळल्यास त्याच माहितीच्या आधारे मला दिलेला प्रवेश रद्द होईल आणि मिळालेली नोकरी गमावण्यास मी बाध्य राहीन व पुढील योग्य त्या कारवाईस पात्र राहीन याची मला संपूर्ण जाणीव आहे.

**स्थळ :** **दिनांक :** **उमेदवाराची स्वाक्षरी.**

### महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापन ) नियम, २००५ नुसार अर्जासोबत जोडावयाच्या लहान कुटूंबाच्या प्रतिज्ञापनाचा नमुना

### प्रतिज्ञापन

मी, श्री./श्रीमती. ---------------------------------- श्री. ---------------- यांचा/यांची मुलगा/मुलगी/पत्नी वय ----------- वर्ष राहणार ------------------------------------------ याद्वारे पुढीलप्रमाणे असे जाहीर करतो / करते की,

१. मी ------------------------------------- या पदासाठी माझा अर्ज दाखल केला आहे.

२. आज रोजी मला -------------(संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दि. २८ मार्च, २००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ------ आहे. (असल्यास जन्मदिनांक नमूद करावा.)

३. हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा जास्त असेल तर दिनांक २८ मार्च, २००५ व तद्‌नंतर जन्माला आलेल्या मुलामुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईन याची मला जाणीव आहे.

**दिनांक -** / /

**ठिकाण -**

**(उमेदवाराची स्वाक्षरी)**